**रे. दि.मु. नं. १७/२०१८**
**नि. क्र. १३९ लगत**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ विजय यशवंत शिंदे यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. जी. एन. गवाणकर यांचेकडून शपथेवर सुरु -**

१. हे म्हणणे खरे मी कोंडे आगरवाडी येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी मराठवाडी येथे राहतात. माझ्या म्हणण्यानुसार दावा मिळकत अनु. क्र. ३ ही स.नं. २४/७ आहे, अनु. क्र. ४ स.नं. २४/८ आहे व अनु. क्र. ५ ही स.नं. २४/११ आहे. मला दावा मिळकत अनु. क्र ३,४,५ असे वर्णन वादीने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की मी दाव्याची प्रत घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी वादीचा दावा व प्रतिवादीची कैफियत वाचलेली नाही. माझ्याकडे स.नं.२४/६ या मिळकतीचा सातबारा उतारा आहे. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी मी तो दाव्यामध्ये हजर केलेला नाही. माझ्या घराला व गोठयाला ग्रामपंचायतीचा नोंदणीक्रमांक आहे. मी दाव्यामध्ये तसे कागद हजर केले नाहीत हे म्हणणे खरे आहे. हे म्हणणे खरे नाही की स .नं २४/६ ही मिळकत माझी असून त्यामध्ये माझे राहते घर व गोठा आहे हे मी खोटे सांगत आहे. माझ्याकडे सदर मिळकतीमध्ये मी आंबा आणि काजूची झाडे लावण्याकरीता विकत घेतलेबाबत पुरावा नाही हे म्हणणे खरे आहे. हे म्हणणे खरे नाही की मी या घरात जन्मापासून राहतो हे खोटे लिहिले आहे.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.08.04 10:47:45 +0530

२. हे म्हणणे खरे आहे की स.नं. १७८/३ माझ्या घराजवळपास

नाही. हे म्हणणे खरे आहे की स.नं. १७८/३ मध्ये गेल्या चार ते पाच वर्षापूर्वी वादीने शेड बांधलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी कुंटुबिय या मिळकतीच्या काही भागात भातशेती करतात हे मी खोटे लिहिले आहे. हे म्हणणे खरे नाही की स.नं. १६३/४ व १६२/२ या मिळकतीमध्ये वादी कवळ राबाचे उत्पन्न घेतात व त्यांची वहिवाट मी प्रत्यक्ष पाहिली आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी मुखत्यार माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की त्यांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**
**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.08.04 10:47:49 +0530

(श्रुती ह. पाटील )

दि. ०२/०८/२०२३

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
देवरुख